**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यक्रम घोषित

अमरावती.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ९९ नुसार विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद, महाविद्यालय विद्यार्थी परिषद, विद्यापीठ विद्यार्थी संघ व विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठीत करावयाची आहे. महाराष्ट्र शासनाने राजपत्रामध्ये प्रकाशित निर्देशाप्रमाणे यावर्षी नव्याने विद्यार्थी परिषद गठणासाठी निवडणूका होणार आहेत.

महाविद्यालय विद्यार्थी परिषद व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद निवडणूकीचा सविस्तर कार्यक्रम २०१९-२० विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आला आहे. विद्यार्थी परिषद निवडणूकीकरीता शैक्षणिक सत्र २०१९-२० वर्षासाठी विद्यार्थ्यांचा पूर्ण वेळ अभ्यासक्रमाला प्रवेश दि. १६ ऑगस्ट, २०१९ पर्यंत झालेला असावा. निवडणूक आदर्श आचारसंहिता ही दि. १६ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत राहणार आहे. महाविद्यालय विद्यार्थी परिषद व विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद निवडणूकीसाठी दि. ४ सप्टेंबर, २०१९ रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणी व निकाल घोषित होईल.

विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवडणूकीसाठी तात्पुरती मतदार यादी दि. ९ सप्टेंबर, २०१९ रोजी विद्यापीठ संकेतस्थळ व सूचना फलकावर प्रसिद्ध होईल. त्यानंतर पूर्ण प्रक्रिया झाल्यावर निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची अंतीम यादी दि. १८ सप्टेंबर, २०१९ रोजी प्रसिद्ध होणार असून दि. २५ सप्टेंबर रोजी विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी भवन येथे मतदान होईल. मतमोजणी नंतर निकाल दि. २७ सप्टेंबर रोजी जाहीर होईल. दि. ३० सप्टेंबर रोजी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ९९ (४)(ख) नुसार विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठण करण्यात येईल.

विद्यार्थी परिषद निवडणूकीची सविस्तर कार्यक्रमपत्रिका www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली असून सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविण्यात आली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेशकुमार सातंगे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/०८/२०१९.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी